# <u>प्रेस नोट</u>

**विषय : पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघांच्या मतदारयाद्या नव्याने तयार करण्याच्या सुधारित कार्यक्रमाबाबत**

मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. ३२२*/MT-LC/G&t/E-Roll-BIEN* दि. १४.११.२०२५ तसेच मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. *ईएलआर-२०२५/प्र.क्र.८७/निवडणूक*-६ दि. १४.११.२०२५ अन्वये पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघासाठी नव्याने मतदारयाद्या तयार करण्याबाबतचा सुधारित कार्यक्रम खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कार्यक्रमाचे टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | मतदार नोंदणी अधिनियम, १९६० चे कलम ३१(३) अन्वये जाहीर सूचना प्रसिद्ध करणे | ३० सप्टेंबर २०२५ (मंगळवार) |
| २ | कलम ३१(४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची प्रथम पुनर्प्रसिद्धी | १५ ऑक्टोबर २०२५ (बुधवार) |
| ३ | कलम ३१(४) अन्वये वर्तमानपत्रातील नोटीसीची द्वितीय पुनर्प्रसिद्धी | २५ ऑक्टोबर २०२५ (शनिवार) |
| ४ | नमुना क्र. १८ किंवा १९ द्वारे अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक | ०६ नोव्हेंबर २०२५ (गुरुवार) |
| ५ | हस्तलिखिते तयार करणे व प्रारूप मतदारयाद्यांची छपाई | २८ नोव्हेंबर २०२५ (शुक्रवार) |
| ६ | प्रारूप मतदारयाद्यांची प्रसिद्धी | ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) |
| ७ | दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी (कलम १२ अन्वये) | ०३ डिसेंबर २०२५ (बुधवार) ते १८ डिसेंबर २०२५ (गुरुवार) |
| ८ | दावे व हरकतींचे निपटारा, पुरवणी यादी तयार करणे व छपाई | ०५ जानेवारी २०२६ (सोमवार) |
| ९ | अंतिम मतदारयादी प्रसिद्धी | १२ जानेवारी २०२६ (सोमवार) |

वरील सुधारित कार्यक्रमानुसार सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, पदनिर्देशित अधिकारी तसेच संबंधित स्थानिक कार्यालयांना आवश्यक त्या कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत.

सुधारित वेळापत्रकानुसार दावे व हरकती दाखल करण्याचा कालावधी तसेच प्रारूप व अंतिम मतदारयाद्या प्रसिद्धीचे दिनांक याबाबत करण्यात आलेल्या बदलांची नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी, पुणे विभाग पदवीधर व शिक्षक विधानपरिषद मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी केले आहे.

(तुषार ठोंबरे)
अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे विभाग, पुणे